महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER
ONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/ 2434
दि. ०५/११/२०२६

प्रति,

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती

विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी)फेब्रुवारी/मार्च २०२७परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट(अर्ज क्रं१७)होणा-या विदयार्थ्यांना ऑनलाईन नावनोंदणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-३/४७८३, दि.०४/११/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी/मार्च २०२७ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्रं १७) होणा-या विदयार्थ्यांना ऑनलाईन नावनोंदणी करणेसाठी मुदतवाढीबाबतचे प्रकटन पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

मुळ स्थळप्रत मा. विभागीय सचिव यांचे स्वाक्षरीत

सहपत्र :- प्रकटनाची प्रत

आपली विश्वासू

S. Salunke 05/11/2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२) मा.विभागीय उपसंचालक,अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव.
३) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.
४) प्राचार्य/मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त शाळा,व कनिष्ठ महाविदयालय,अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८ १७९, ई बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-३/4782
पुणे - ४११००४
दिनांक ०४/११/२०२६

महत्त्वाचे

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रुवारी- मार्च २०२७ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क. १७) होणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन नावनोंदणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ:- या कार्यालयाचे क. रा.मं/परीक्षा-३/३२३४ दि. ३१/०७/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने नियमित, विलंब व अतिविलंब शुल्कासह स्विकारण्यासाठी दि. ०१/०८/२०२६ ते दि. ३१/१०/२०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

जे विद्यार्थी सदर मुदतीत नावनोंदणी करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

तपशील	अतिविलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन सादर करणे (मुदतवाढ)
विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे.	गुरुवार दि. ०५/११/२०२६ ते बुधवार दि.१८/११/२०२६ पर्यंत

1. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी अर्ज करण्यासाठी http://www.mahahsscboard.in या वेबसाईटचा वापर करावा. सदर अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर सूचना वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.
2. विभागीय मंडळांनी सदर नावनोंदणी अर्जाची छाननी करून नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment certificate) Online पध्दतीने तात्काळ निर्गमित करावीत म्हणजे संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे मुदतीत (दि.३०/११/२०२६ पर्यंत) भरणे सुलभ होईल.
3. फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज करण्यासाठी यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने)

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –
1. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ.
2. लेखा शाखा , राज्य मंडळ.

Scanned with OKEN Scanner